मंगळवार दिनांक १३/१०/२०१५ रोजी सकाळी ०१.०० वाजता बांधकाम समिती सभागृह जि.प.सातारा येथे झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत

| सभेची तारीख व वेळ | उपस्थित असलेल्या सभासदाची नावे | |
|---|---|---|
| मंगळवार दिनांक | १) मा.श्री.साळुंखे प्रदीप उर्फ रवि सुर्यकांत | सभापती |
| १३/१०/२०१५ रोजी | २) मा.श्री.भोसले राजू अनिल | सदस्य |
| दुपारी १.०० वाजता | ३) मा.सौ.पाटील सुरेखा महेंद्र | सदस्या |
| | ४) मा.श्री.कदम राहूल बबनराव | सदस्य |
| | ५) मा.श्री.पवार शशिकात निवृत्ती | सदस्य |
| | ६) मा.श्री.जाधव सदाशिव यशवंत | सदस्य |
| | ७) मा.सौ.घाडगे सावित्रा मानाजी | सदस्या |
| | ८) मा.सौ.शिंदे राधाबाई दिनकर | सदस्या |
| | ९) मा.श्री.जयवंत दिनकर जगताप | सदस्य |

सर्व संबधितांचे उपस्थितीमध्ये मा.सभापती बांधकाम समिती जिल्हा परिषद सातारा यांचे परवानगीने सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

**<u>बांधकाम समिती सभा दिनांक १३/१०/२०१५ रोजीचे दुखवटा ठराव</u>**

**माण तालुक्यातील राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जेष्ठ नेते व राज्याच्या विधान परिषदेचे माजी आमदार सदाशिवराव पोळ वय ७५ यांचे दिनांक ३० सप्टेबर २०१५ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले त्यांनी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष पद भुषविलेले होते. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हीच इश्वर चरणी प्रार्थना त्यांच्या कुटुंबियांच्या दुखाःत ही सीाा सहभागी होत आहे.**

**//ईश्वर दिवंगताचे आत्म्यास सद्‌गती व शांती देवो.//**

विषय क्रं.१ :- दिनांक १८.०९.२०१५ रोजी झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव क्रं.२११ :- दिनांक १८.०९.२०१५ रोजी झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणेत आला.

सूचक :- मा.सौ.राधाबाई दिनकर शिंदे
अनुमोदकः- मा.श्री.पवार शशीकांत निवृत्ती

**ठराव सर्वानुमते मंजूर**

विषय क्रं.२ :- विविध योजनांच्या कामांचा तालुकानिहाय आढावा घेणे.

ठराव क्रं. २१२ :- विविध योजनेच्या कामांचा तालुकानिहाय आढावा घेणेत आला. तसेच कामे मुदतीत पूर्ण होण्याच्या दृष्टीने उप अभियंता यांना आवश्यक त्या सूचना देणेत आल्या.

सूचक :- मा.सौ.पाटील सुरेखा महेंद्र
अनुमोदक :- मा.सौ.राधाबई दिनकर शिंदे

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.३ :-सातारा जिल्हा परिषदेकडील बांधकाम उत्तर व दक्षिण विभागा कडिल लेखाविषयक नोंदवहया दिनांक १ जुलै २०१५ ते ३० सप्टेबर २०१५ अखेर अदयावत व परिपुर्ण असलेने त्याचे अवलोकन करुन मंजूरी देणे बाबत विचार करणे.

ठराव क्रं.२१३ :- बांधकाम उत्तर व दक्षिण विभागाकडिल ठेवण्यात आलेल्या खालीलप्रमाणे लेखा विषयक नोंदवहया दिनांक १ जुलै २०१५ ते ३० सप्टेबर २०१५ अखेर अदयावत व परिपुर्ण ठेवलेल्या असले बाबत सचिव यांनी समितीचे निदर्शनास आणून दिले. तसेच दिनांक १ जानेवारी २०१५ ते ३० जून अखेरच्या नोंदवहया जिल्हा परिषदेचे वार्षीक लेखे पूर्ण न झालेने यापुर्वी वेळेत आद्यावत करता आल्या नव्हत्या. आता सदर नोंदवहया आद्यावत व परिपूर्ण करणेत आल्या असलेचे सचिव यांनी समितीचे निदर्शनास आणून दिले. शासनाकडिल परिपत्रक क्रमांक पंरास/१०८८/४८०/२७ दिनांक ११/१/१९७९ नुसार सदर नोंदवहयाचे अवलोकन करण्यात येवुन दिनांक ०१ जानेवारी २०१५ ते ३० सप्टेंबर २०१५ अखेर नोंदवहया आद्यावत व परिपूर्ण असलेचे अवलोकन करुन त्यास ही सभा मंजुरी देत आहे.

१. रोकड नोंदवही नमुना नं.४
२. प्राप्त धनादेश नोंदवही नमुना नं.११
३. प्रदानार्थ मिळालेल्या देयकाची नोंदवही
४. योजनेच्या प्रगतीची नोंदवही
५. स्थावर मालमत्ता नोंदवही नमुना नंबर ३९
६. रस्त्याची नोंदवही नमुना नंबर ४०
७. योजनेच्या कामाची नोंदवही नमुना नंबर ४२
८. नंबरवार हजेरीपत्रक नोंदवही नमना नंबर ४६
९. करारबध्द ठेकेदारांची नोंदवही नमुना नंबर ४८
१०. मोजमाप पुस्तकाची नोंदवही नमुना नंबर ५३
११. निलंबन नोंदवही नमुना नंबर ७९
१२. मंजुर अंदाजपत्रक नोंदवही नमुना नंबर ८५
१३. दुरध्वनी नोंदवही नमना नंबर ९१

सूचक :- मा.श्री.पवार शशिकांत निवृत्ती
अनुमोदक :- मा.सौ.राधाबाई दिनकर शिंदे

**ठराव सर्वानुमते मंजुर**

ऐ.विषय क्रं.४:- मांढरदेव पालन रस्ता ग्रामा ५० सा.क्र.२/००० ते २/५०० कि.मी.सुधारणा करणे. ता.वाई जि.सातारा या कामाची निविदा स्विकृतीस मंजुरी देणे बाबत विचार करणे.

ठराव क्रं.२१४ :-३०५४ मार्ग व पुल जिल्हा व इतर मार्ग या शिर्षकाखाली मांढरदेव पालन रस्ता ग्रामा ५० सा.क्र.२/००० ते २/५०० किमी सुधारणा करणे ता वाई जि सातारा या कामाची निविदा रक्कम रुपये २४,१२,८४३/- ची निविदा http://mahatenders.gov.in संकेतस्थळावर दिनांक ०९/०९/२०१५ ते २३/०९/२०१५ रोजी ई निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर कामाचा दुसरा

लखोटा दिनांक ३०/०९/२०१५ रोजी दराचा लखोटा उघडला असता मे सार्थक कन्ष्ट्रक्शन सातारा यांची ंदाजपत्रकीय रकमेपेक्षा (+) ४.७ टक्के जादा दराने परंतु तुलनेने सर्वात कमी दराची निविदा प्राप्त झाली. मे सार्थक कन्ष्ट्रक्शन सातारा यांना दर कमी करणे बाबत कळविले असता संबधित मक्तेदाराने दिनांक ०१/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये ३.५० टक्के जादा दराने म्हणजेच र.रु.२४,९७,२९३/- ने सदरचे काम करणेस तयार असलेचे कळविले आहे. तरी र.रु.२४९७२९३/- ही सर्वात कमी दराची निविदा असल्याने महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२०१२/प्र.क्र.६८०/वित्त-९ दिनांक ३१ जानेवारी २०१३ नुसार सदरची निविदा स्विकृतीस मान्यता देणेत येत आहे.

सूचक :- मा.श्री.पवार शशिकांत निवृत्ती
अनुमोदक :- मा.सौ.पाटील सुरेखा महेंद्र

**ठराव सर्वानुमते मंजुर**

ऐ.वे.विषय क्रं.५:- सातारा जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडील सन २०१३-१४ च्या स्थानिक निधी लेखा परिक्षण अहवालातील १७२ शकांना दिलेल्या प्रथम पुर्तता उत्तरांना मान्यता देवुन अंतिम मान्यतेसाठी जिल्हा परिषदेस सादर करण्यास शिफारस करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रं.२१५:- सातारा जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडिल सन २०१३-१४ च्या स्थानिक निधी लेखा परिक्षण अहवालातील १७२ शकांना दिलेल्या प्रथम उत्तरांना मुंबई स्थानिक अधिनियम १९३० चे कलम १० (१) नुसार मान्यता देवुन अंतिम मान्यतेसाठी जिल्हा परिषदेस शिफारस करणेत येत आहे.

सूचक :- मा.सौ.पाटील सुरेखा महेंद्र
अनुमोदक :- मा.सौ.राधाबाई दिनकर शिंदे

ठराव सर्वानुमते मंजुर

येणेप्रमाणे विचार विनिमय झालेनंतर मा.जि.प.सदस्य,श्री.पवार शशिकांत निवृत्ती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व सभा संपलेचे जाहिर केले.

**सही/XXX**
**सचिव**
**बांधकाम समिती जि.प.सातारा**

**सही/XXX**
**सभापती**
**बांधकाम समिती जि.प.सातारा**